| | |
|---|---|
| MHKO160007802023 | **पी.डब्ल्यू.डी.व्ही.अर्ज क्र.१६/२०२३ मधील नि.क्र. ०४ खालील आदेश** |

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जाची थोडक्यात हकीकत अशी की,

अर्जदार आणि विरूध्द पक्षकार क्र.१ यांचे लग्न अर्जदार हीचे घरी बौध्द धर्मशास्त्र रितीरिवाजाप्रमाणे दि.१८/०५/२०१६ रोजी झाले असून त्यांचे नातेसंबंध आजतागायत अस्तित्वात आहेत. वि.प. यांनी अर्जदारास विवाहापासून शारीरीक व मानसिक त्रास देऊन अर्वाच्च शिवीगाळ व मारहान करीत आहेत. तसेच अर्जदार हीला वि.प. यांनी कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर काढलेले आहे, तसेच तेव्हापासून अर्जदार ही नाईलाजास्तव तिचे माहेरी आई वडिलांसोबत रहात आहे व तिला तिचे आई वडिलांवर अवलंबून रहावे लागत आहे. वि.प. यांनी अर्जदार हीची कोणत्याही प्रकारे विचारपूस केली नाही, तसेच तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय वि.प. यांनी केलेली नाही. अर्जदार ही कसेबसे तिचे माहेरी जीवन कंठत आहे, तसेच तिचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदारचे माहेरची परिस्थिती हालाखीची आहे. अर्जदाराने अनेक प्रयत्न करूनही वि.प. यांनी तिला नांदायला नेलेले नाही. वि.प.क्र.१ हे सोनार व्यावसायिक असून त्यांना त्यातून दरमहा तीस ते चाळीस हजार उत्पन्न मिळते. तसेच त्यांची जांबूर, ता. शाहुवाडी येथे तीन एकर बागायत शेती असून त्यातून त्यांना वार्षिक चार ते पाच लाख रूपये उत्पन्न मिळते. शेवटी अर्जदाराने सदरचे अर्जाद्वारे अंतरिम पोटगीस्वरूपी दरमहा पंधरा हजार रूपये मिळणेबाबत व कोर्ट खर्च, येणे.जाणेचा खर्च इ. करीता रक्कम रूपये पन्नास हजार रूपये मिळावेत अशी मागणी केली आहे.

४. विरूध्द पक्षकार क्र.१ यांनी सदरकामी आपले म्हणणे नि.११ वर दाखल करून लग्नाबाबतचा मजकूर मान्य करून इतर सर्व मजकूर नाकारला आहे. त्यांनी वस्तुस्थितीमध्ये कथन केले की त्यांचे लग्न वि.प.क्र.१ यांचे राहते घरी संपन्न झाला असून लग्नाचा संपूर्ण खर्च त्यांनी केला. वि.प. यांनी अर्जदारास कधीही मारहान केली नाही

अथवा तिला कोणत्याही प्रकारे शारीरीक व मानसिक त्रास दिला नाही. वि.प.क्र.१ यांनी अर्जदाराची कोणत्याही प्रकारची फसवणूक केलेली नाही. वि.प.क्र.१ यांनी अर्जदाराकडे माहेरहून पैसे आणणेची अपेक्ष कधीही केलेली नव्हती व नाही, तसेच त्यांनी अर्जदाराचा कधीही त्याग केलेला नाही. अर्जदार ही अतिशय विक्षिप्त स्वभावी असलेने व तिचेपासून होणारा त्रास असहनिय झालेने वि.प.क्र.१ यांनी अर्जदाराविरूध्द घटस्फोटाकरीता अर्ज दाखल केला आहे व तो न्यायप्रविष्ट आहे. वि.प.क्र.१ यांनी अर्जदारास कधीही मारहान केलेली नाही. अर्जदाराने वि.प. यांना त्रास व्हावा व तडजोडीपोटी मोठी भरीव रक्कम मिळावी म्हणून सदरचा अर्ज केला आहे. वि.प.क्र.१ यांनी अर्जदाराचा कधीही त्याग केलेला नाही, तसेच तिचेवर कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार केलेला नाही. अर्जदाराच्या सर्व मागण्या अवास्तव व वि.प. यांचे अपरिमित नुकसान होणा-या आहेत. वि.प.क्र.१ हे सोनार व्यावसायिक नसून त्यांची जांबूर, ता. शाहुवाडी येथे तीन एकर बागायत शेती देखिल नाही. वि.प.क्र.१ हे कुटुंबातील एकमेव कमवते व्यक्ती असून त्यांचेवर त्यांचे वयोवृध्द आई-वडिल यांना सांभाळण्याची जबाबदारी आहे. वि.प.क्र.१ यास दरमहा पंधरा हजार उत्पन्न मिळत असून त्यातून त्यांना त्यांचा उदरनिर्वाह करावा लागतो. अर्जदार हीने सन २०१८ मध्ये वि.प. यांचा त्याग केला असून सन २०२३ मध्ये तिने सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार या किरकोळ कारणावरून वारंवार भांडणतंटा करीत असत, तसेच आपले बहिणीचे सांगणेवरून वारंवार माहेरी निघून जात. अर्जदार या वि.प. यांचा वारंवार अपमान करीत असत. अर्जदार यांनी सन २०१८ मध्ये कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय तिच्या माहेरी निघून गेल्या. अर्जदारास वारंवार सांगून देखिल त्या नांदावयास आल्या नाहीत. शेवटी त्यांनी सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली.

६. प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत, मी त्याचा निष्कर्ष कारणांसहित नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार यांचेवर वि.प. यांचेकडून प्राथमिकतः कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| २ | अर्जदार या वि.प.क्र.१ यांचेविरूध्द मूळ अर्जाचे निकालापावेतो उदरनिर्वाहाकरीता दरमहा पंधरा हजार रूपये अंतरिम पोटगी मिळण्यास व सदर अर्जाचे खर्चस्वरूपी पन्नास हजार रूपये मिळण्यास पात्र आहेत काय ? | अंशत: होकारार्थी, अंतिम आदेशानुसार. |

| | | |
|---|---|---|
| ३ | आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>
## <u>- मुद्दा क्र १ ते ३ करीता -</u>

७. मी अर्जदार व वि.प.क्र.१ यांचे वादकथन, अभिलेखावरील दाखल केलेली कागदपत्रें यांचे अवलोकन केलेले आहे. अर्जदार यांनी नि.०३,नि.१५ सोबत अर्जदाराने तिचे वडिलांचेवरील औषधोपचाराची बिले, वि.प. यांचे वडिलार्जित जमिनीचे ७/१२,८अ व ॲसेसमेंट उतारे, वि.प.क्र.१ सोने व्यापारी असलेबाबत त्यांचे व्हीजीटींग कार्ड इ. कागदपत्रें दाखल केली आहेत. तसेच संरक्षण अधिकारी, शाहूवाडी यांचा सविस्तर कौटुंबिक घटना अहवाल सदरकामी प्राप्त झाला आहे. अर्जदार यांनी नि.१३ वर तर विरूध्द पक्षकार क्र.३ यांनी नि.१७ वर त्यांचे मालमत्ता व कर्जासंबंधी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

८. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला, सर्व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व विरूध्द पक्षकार क्र.१ यांचा विवाह झाला असून सदरचा विवाह आजरोजी अस्तित्वात असल्याचे दोन्ही बाजूंना मान्य व कबूल आहे. अर्जदार यांनी त्यांचे अर्जामध्ये त्यांचेवर झालेल्या शारीरीक व मानसिक छळाच्या घटनाबाबत सविस्तर कथन केले आहे. वि.प.क्र.१ यांनी अर्जदाराच्या अर्जातील सर्व घटना नाकारल्या आहेत. अर्जदार व वि.प.क्र.१ यांची परस्परविरोधी कथने पाहता याबाबत पुरेसा व विस्तृत पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत दोन्ही पक्षांनी परस्परविरोधी केलेली कथने ग्राह्य धरता येणार नाहीत. परंतू अर्जदार व वि.प.क्र.१ हे एकमेकांपासून विभक्त रहात असून अर्जदार ही सध्या तिचे माहेरी राहात आहे असे प्रथमदर्शनी दिसते.

९. अर्जदार व विरूध्द पक्षकार यांचे वैवाहीक नातेसंबंध कायम असताना अर्जदाराच्या पालनपोषणाची जबाबदारी विरूध्द पक्षकार वर आहे. परंतू अभिलेखावरून असे दिसून येते की वि.प.क्र.१ हे अर्जदाराच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी सद्य परिस्थितीत पार पाडत नसून अर्जदार ही आजरोजी तिचे माहेरी राहात आहे. अर्जदारास स्वत:च्या उत्पन्नाचा स्त्रोत असल्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. तसेच अर्जदार स्वत:चे पालनपोषण करण्यास शैक्षणिकदृष्ट्या

सबल असल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर सादर झाला नसल्यामुळे अर्जदाराच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी पती या नात्याने वि.प.क्र.१ याची आहे. अर्जदाराचा कौटुंबिक छळ झाला आहे किंवा कसे याबाबत दोन्ही पक्षांनी परस्परविरोधी कथने केल्यामुळे सद्य स्थितीला अर्जदाराचा कौटुंबिक छळ झाला आहे किंवा कसे याबाबत निष्कर्ष नोंदविणे न्यायोचित होणार नाही. परंतू उपरोक्त चर्चेनुसार अर्जदार व वि.प. यांच्यातील नातेसंबंध लक्षात घेता अर्जदाराच्या उदरनिर्वाहासाठी वि.प.क्र.१ याने दरमहा पोटगी देणे न्यायोचित होईल.

१०. अर्जदार हीने वि.प.क्र.१ यांचे मासिक उत्तपन्न तीस ते चाळीस हजार असल्याचे कथन केले आहे, तथापि वि.प.क्र.१ यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांचे मासिक उत्पन्न पंधरा हजार असल्याचे कथन केले आहे. वि.प. याने त्यांचेकडे तीन एकर बागायत जमीन असल्याचे नाकारले असले तरी अर्जदार हीने वि.प.क्र.२ यांचे वडिलार्जित मिळकतींचे ७/१२,८अ व ॲसेसमेंट उतारे अशी कागदपत्रें दाखल केली आहेत. तसेच अर्जदार हीने वि.प.क्र.१ सोने व्यापारी असलेबाबत त्यांचे व्हीजीटींग कार्ड दाखल केले आहे. एकूणच वि.प. यांची आर्थिक स्थिती चांगली असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. आजरोजी अर्जदार ही तिच्या माहेरी तिचे आईवडिलांचे घरी रहात असल्याचे दिसत आहे. अर्जदार हीचेकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसून ती तिचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे दिसत आहे. वि.प. यांनी अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची व रहाण्याची कोणतीही सोय केलेली नाही. एकूणच अर्जदार व वि.प. यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता अर्जदार हीस प्रस्तुतची केस चालविणे व दैनंदिन गरजा भागविणे यासाठी उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने अंतरिम पोटगी मिळणेस अर्जदार पात्र आहे. वि.प. यांची अर्जदारास सांभाळण्याची कायदेशीर व नैतीक जबाबदारी आहे व या जबाबदारीतून ते मुक्त होऊ शकत नाहीत. सबब, कौटुंबिक हिंसाचार कायद्याचा उद्देश पाहता, अर्जदार यांना विरूध्द पक्षकार क्र.१ यांचेकडून उदरनिर्वाहासाठी दरमहा तीन हजार अंतरिम पोटगी देणे न्याययोग्य होईल. अर्जदार सध्या तिच्या आईवडिलांसोबत रहात असल्यामुळे व दोन्ही बाजूंचा विस्तृत पुरावा अभिलेखावर न आलेने सद्य स्थितीत अर्जदाराने मागणी केलेल्या अन्य मागण्या मंजूर करणे न्यायोचित होणार नाही.

११. सबब, वर नमूद प्रथमदर्शनी शाबित झालेल्या घटनेस अनुसरून मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे, मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोदंवित आहे, मुद्दा क्र. ३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.०४ अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. विरूध्द पक्षकार क्र. १ यांना आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अर्जदार हीस मुळ अर्जाचे निर्णयपावेतो उदरनिर्वाहासाठी दरमहा रक्कम रू.३,०००/- (रक्कम रू. तीन हजार फक्त) इतकी अंतरिम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारीख म्हणजे दि.२३/०८/२०२३ पासून मूळ अर्ज (निशानी क्र.१) निकाली होईपर्यंत द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामुल्य अदा करणेत यावी.

**(खुल्या न्यायालयात घोषीत)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Pankaj Bhimrao Pawar

**दिनांक - २९/१२/२०२५**

**( पी. बी. पवार )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**मलकापूर-शाहुवाडी, जि. कोल्हापुर**